



*विवाहित भारतीय नारी*

प्रस्तावना

आज जगात देशांतर्गत कोणताच समाज एकजिनसी नाही. श्रद्धा, वर्ण, वंश, भाषा, परंपरा यांनी समाज बहुजिनसी बनतात. त्यात आर्थिक स्तर, राजकीय सत्ता, सांस्कृतिक मद अशा अनेक घटकांची भर पडते. मग भिन्न समूहांमध्ये उच्चनीचता निर्माण होते. या भेदभावातून उपेक्षा येते. (discrimination - यापुढे लेखात - उपेक्षा). ही उपेक्षा व्यवस्थात्मक होते. विसाव्या शतकात लोकशाही, मानवी हक्क, सगळे नागरिक समान या संकल्पना पुढे आल्या. त्यामुळे एका बाजूला अस्मिता व दुसऱ्या बाजूला या अर्वाचीन संकल्पना हे चित्र उभे राहिले.

मग सामाजिक भांडवलाचे पुनर्वितरण करून उपेक्षा दूर करावी हा विचार पुढे आला व आज अनेक देशात तो धोरणाचा भाग झाला आहे. भारतातील आरक्षण हे त्याचेच उदाहरण. निरनिराळ्या देशात ते धोरण निरनिराळ्या नावांनी राबवले जाते. त्याला आंतरराष्ट्रीय कायद्याची मान्यता आहे. लेखाच्या सोयीसाठी आरक्षण ही संज्ञा वापरली आहे.

समाजाचा सम्यक् विचार करता तीन स्तर आढळतात. एक बहुसंख्य किंवा मुख्य प्रवाह. दुसरा स्तर आरक्षण असलेल्यांचा. हे दोन स्तर 'दृश्य' असतात कारण ते सतत विवादात, प्रसंगी संघर्षात असतात. म्हणून प्रसारमाध्यमात असतात. त्यामुळे हे दोन स्तर म्हणजेच संपूर्ण समाज हा भ्रम निर्माण होतो.

# आरक्षण व रक्षण

## चन्द्रशेखर पुरन्दरे

परंतु तिसरा 'अदृश्य' स्तर जगात आज वाढताना दिसतो. तो समाजाच्या अगदी बाहेर, दुबळा व असंघटित असतो. त्यांच्या बळींच्या संख्येचे केवळ अंदाज असतात. निर्वासित, बलात्कारित स्त्रिया, देशोधडीला लागणारी मुले इत्यादी खरे उपेक्षित. त्यांना प्रतिनिधित्व नाही. आर्थिक, राजकीय सत्तांच्या ते खिजगणतीत नाहीत. जगण्याची किमान संसाधने नसल्याने ते संघर्षाला उभे राहू शकत नाहीत म्हणून त्यांच्यासाठी आंदोलनेही उभी राहत नाहीत. त्यांना रक्षणच नाही तर आरक्षण कोठून असणार?

आरक्षणासंदर्भात चर्चा होते ती केंद्रस्थानच्या मुख्य प्रवाहाची व आरक्षण असणाऱ्या परिघाची. (या केंद्र-परिघ संज्ञांतच वस्तुत:



*समतेची पोकळ संकल्पना*

*चित्रकार : चन्द्रशेखर पुरन्दरे*

समाजचिंतनाची मर्यादा स्पष्ट आहे.) म्हणून लेखाच्या शेवटी रक्षणाची जरूरी असणाऱ्या परिघाबाहेरच्या स्तराची नोंद आहे. त्याने सध्याची चर्चा विस्तृत व्हावी ही अपेक्षा आहे.

**लेखाची मांडणी**

प्रथम आरक्षणावरील आजवरच्या समाजशास्त्रीय व मनोवैज्ञानिक चिंतनाचा गोषवारा आहे. नंतर काही विकसनशील देशातील आरक्षणाच्या धोरणांची माहिती व मूल्यमापन आहे. मग आरक्षणाच्या मर्यादा दिल्या आहेत. शेवटी रक्षण जरूरी असणाऱ्या समूहांची उदाहरणे आहेत.

**आरक्षणावरील चिंतन**

आरक्षणाचा प्रश्न समतेशी संलग्न आहे. पण समतेची निर्णायक व्याख्या आजवर झालेली नाही. लेखाच्या संदर्भात समतेकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन प्रस्तुत आहेत. एका दृष्टिकोनानुसार समता दोन प्रकारची असते. औपचारिक समता व खरीखुरी किंवा गाभ्यापासूनची निखळ समता. आरक्षणातून येणारी समता ही औपचारिक समता मानली जाते. निखळ समतेची व्याख्या नाही. दुसरा दृष्टिकोन समतेचा प्रकल्प सामाजिक परिवर्तनवादी असावा का सामाजिक भांडवलाचे पुनर्वितरण करणारा असावा, असा आहे.

हा प्रकल्प परिवर्तनवादी असल्यास जी व्यवस्था विषमता निर्माण करते ती व्यवस्था बदलणे (म्हणजे उत्पादनाच्या संसाधनांची मालकी, बाजाराची कार्यवाही इत्यादी). आरक्षण तो प्रयत्न करत नाही. ते उपेक्षितांना सद्य व्यवस्थेत बसवण्याचा प्रयत्न करते म्हणून आरक्षण हे वर म्हटल्याप्रमाणे पुनर्वितरणाच्या धोरणाचे उदाहरण आहे. वरील दोन दृष्टिकोनांचा संयुक्त विचार करता आरक्षण हे निखळ समता आणण्याच्या मार्गातील एक पाऊल म्हणता येईल किंवा ते निखळ समतेच्या तत्त्वाशी प्रतारणा करते असेही म्हणता येईल. पण प्रतारणा हा आक्षेप महत्त्वाचा वाटला तरी अप्रस्तुत आहे. एखादे धोरण तार्किकदृष्ट्या बरोबर की चूक यापेक्षा सामाजिक न्याय महत्त्वाचा. वंश, वर्ग, स्त्री-पुरुष भेद इत्यादी उपेक्षेच्या आयामांचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे हे आयाम 'त्यांचे ते' विषमता निर्माण करत नाहीत. स्थलकालानुसार समाज या आयामांना सांस्कृतिक मुलामा देतो व त्यातून विषमता निर्माण होते. याचे दोन अन्वयार्थ होतात. एकतर ते आयाम (व उपेक्षा) देवदत्त नाहीत, ते समाजाने निर्माण केलेले आहेत, मग समाजाने दुरूस्त करावेत. पण बहुसंख्य समाजाने आजवर ते केलेले नाही; भविष्यातही ते होण्याची शक्यता नाही म्हणून ही जबाबदारी सरकारवर पडते. त्यामुळे आपापत: आरक्षण 'वरून खाली' येते. ज्यांच्यासाठी ते करायचे त्यांचा - ते कसे असावे, किती जणांसाठी असावे, वगैरे - निर्णयप्रक्रियेत सहभाग नसतो. तो आला तर आरक्षणाला पाया मिळेल.

दुसरा अन्वयार्थ असा की आरक्षण द्वंद्वात्मक भूमिकेवर आधारित राहते. गोरे आहेत म्हणून कृष्णवर्णीय. त्यांच्या हातात सत्ता आहे म्हणून कृष्णवर्णीयांसाठी आरक्षण आणि त्याला जोडून पुढचा मुद्दा म्हणजे आरक्षण भूतकाळाकडे पाहणारे असते. ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन हा त्याचा रोख असतो. त्या परिप्रेक्ष्याला मर्यादा पडतात. ते भविष्याचा वेध घ्यायला अपुरे पडते. द्वंद्वात्मक भूमिकेचे उदाहरण ब्राझीलमध्ये सापडते. तेथे कृष्णवर्णीयांसाठी आरक्षण येईपर्यंत ब्राझीलमध्ये 'इथे सर्व-वंशीय गुण्या गोविंदाने नांदतात' असे स्वप्नरंजन होते. वस्तुत: कृष्णवर्णीयांचे शोषण होत होते, पण आरक्षण येईपर्यंत कृष्णवर्णीयांना आपण कृष्णवर्णीय आहोत म्हणून आपले शोषण होत आहे ही जाणीवच नव्हती.

सरकारवर येणाऱ्या आरक्षणाच्या जबाबदारीचा उल्लेख केला. दुर्दैवाने सरकारच्या हातात फक्त कायदा हे मर्यादित साधन असते. त्याचे थिटेपण अनेक देशांत निरनिराळ्या प्रकारे दिसून आले आहे. ते लेखात पुढे जागोजागी स्पष्ट होईल.

आरक्षणाने उपेक्षित समूहातील लोक इतरांसारखेच सक्षम असतात, हे सिद्ध होते. बृहत् समाजाचा दृष्टिकोन बदलणे हे महत्त्वाचे कार्य आरक्षण करते. त्याचवेळी, अर्थातच, निदान काही उपेक्षितांची तरी पिढ्यान्पिढ्यांचे दारिद्र्य, सामाजिक अवहेलना या दुष्टचक्रातून मुक्तता होते. बृहत् समाजाचा दृष्टिकोन परंपरेने घडवलेला असतो. समाजाने जर एखादा समूह पिढ्यान्पिढ्या मैला डोक्यावरून नेताना पाहिलेला असला, तर हे लोक फक्त हेच काम करू शकतात, असा (पूर्व)ग्रह होतो. कृष्णवर्णीय जबाबदारीच्या पदावर गेला तर दृष्टिकोन बदलायला मदत होते. त्याबरोबरच आरक्षित समूहाचे आत्मभानही 'आपणही 'त्यांच्या'बरोबरीने काम करू शकतो' असे सकारात्मक होते.

म्हणजे, आरक्षणाचा अपेक्षित परिणाम होतो. आरक्षित समूह व इतर यांच्यातील शैक्षणिक, आर्थिक अंतर कमी होते. पण अनपेक्षित परिणाम म्हणजे आरक्षित समूहांतर्गत आहे-रे नाही-रे ही दरी वाढताना दिसते. पंधरा वर्षांच्या आरक्षणानंतर दक्षिण आफ्रिकेत (देशात) कृष्णवर्णीय व गोरे यांच्यातील तफावत जरा कमी झाली, पण कृष्णवर्णीयांतर्गत आर्थिकदृष्ट्या वर्गभेद अधिक तीव्र झाले. आरक्षणाने वरच्या वर्गातील वर्णद्वेष कमी झाला पण खालच्या स्तरावर अंतर कायम राहिले. भारतातही मध्यंतरी जातीयवादाला भांडवलशाही हे उत्तर हाताच्या बोटावर मोजता येण्याइतक्या (दलित-भांडवलदारांच्या) उदाहरणाने यासंदर्भात पुढे आले होते. पण त्यामुळे दलितांच्या एकूण परिस्थितीत फार फरक पडल्याचे दिसले नाही.

समूहावर आधारित आरक्षणात एक शक्यता कायम राहते. ती

म्हणजे असा समूह समाजात मिसळण्याऐवजी (जो आरक्षणाचा हेतू असतो) त्याची ओळख अधोरेखित होते व तो आणखीच बहिष्कृत होऊ शकतो. म्हणजे विषमतेचा प्रश्न सुटल्यासारखा दिसतो, पण सुटत नाही. ज्यांच्यासाठी आरक्षण करायचे, ते समूह निश्चित करणे हा पुढचा अनुत्तरित प्रश्न. काही कारणाने वर्ण-वंश-धर्म इत्यादी - ज्यांना उपेक्षा सहन करावी लागली व लागते तशीच उपेक्षा या समूहाबाहेरच्या काहीजणांना आज सहन करावी लागते पण त्यांना आरक्षण मिळत नाही. आरक्षित समूहातही प्रत्येक व्यक्तीला उपेक्षा सहन करावी लागतेच असे नाही. उदा. अमेरिकेतील सुशिक्षित, संपन्न कृष्णवर्णीयांची दुसरी पिढी.

सामाजिक अभिसरणाचा वर उल्लेख केला. त्याबरोबर सामाजिक निर्णयप्रक्रियेत सहभागही उपेक्षा थांबवण्यासाठी उदरनिर्वाहाच्या हमीइतकाच महत्त्वाचा असतो. त्याचे मोजमाप कठीण आहे पण आरक्षण, परत कायद्याच्या संकुचित मार्गाने आल्याने अमुक टक्के जागा भरणे, उदरनिर्वाहाची सोय करणे इतपतच मर्यादित राहू शकते.

त्यामुळे म्हणजे, बृहत् समाजात अभिसरण न होण्याचा परिणाम म्हणजे आरक्षित समूह एरवी त्या पदासाठी अयोग्य असतो हा समज दृढ होतो. अमेरिकेत कृष्णवर्णीयांबाबत हा समज आढळतो.

**मनोवैज्ञानिक निरीक्षणे**

आरक्षणाच्या धोरणाच्या अंमलबजावणीतील विभिन्न समाजात सतत आढळणाऱ्या त्याच त्याच त्रुटींचा मनोवैज्ञानिक आभास झालेला आहे. 'जागृत' मनात जरी माणसे समतेचा पुरस्कार करीत असली ('मी जातिभेद मानत नाही') तरी जवळजवळ सगळेच हा दृष्टिकोन पूर्णत: आत्मसात करत नाहीत. म्हणजे तो त्यांच्या 'सुप्त' मनापर्यंत पोचत नाही, मग तो खोलवर मुरणे दूरच. माहितीचे अनंत तुकडे आपल्यावर दररोज ओतणाऱ्या गुंतागुंतीच्या जगात भराभर निर्णय घेण्यासाठी कामचलाऊ व त्वरित उपलब्ध असणारी गृहीते उपयोगी पडतात, कारण ती माणसांना पटकन कप्प्यात बसवतात. कृष्णवर्णीय दिसला की कृष्णेतरांचे पहिले मत असते - हा अशिक्षित, अडाणी, असंस्कृत, लफंगा असणार. हा पूर्वग्रह निर्णयक्षमतेचे गृहीत होते. वस्तुत: असा दृष्टिकोन अज्ञानमूलक असतो. पण तो जागृत मनाने आता काय पवित्रा घ्यायचा त्याची आठवण करून देतो. मग कृष्णवर्णीय इतरांसारखा, आपल्यासारखाच आहे हा पवित्रा आपण घेतो. त्या कृष्णवर्णीयांबाबतचे निर्णय जागृत मन घेत असेल तर निर्णय पूर्वग्रहरहित असतो पण दैनंदिन दिवसाच्या अनेक निर्णय भराभर घेण्याच्या बोजाखाली सुप्त मन निर्णय घेण्याची शक्यता जास्त असते. अनेकांनी असे निर्णय कृष्णवर्णीयांबद्दल घेतले की त्या समूहाची उपेक्षा होते. सामाजिक स्तरावर त्यामुळे उपेक्षा दोन प्रकारे होते. एक उघड उपेक्षा. ती लोकांच्या वागण्यात आणि खासगी व्यवहारात स्पष्ट होते. मिसबा कादरीला मुंबईत भाड्याने फ्लॅट न मिळणे किंवा झीशान अलीला हरेकृष्ण एक्स्पोर्टमध्ये नोकरी न मिळणे हे प्रकार मुसलमानांची उघड उपेक्षा दर्शवतात. तोच प्रकार अलिकडे वाढलेल्या कृष्णवर्णीय अमेरिकनांवरील हिंसाचारात दिसतो. पण छुपी उपेक्षा धोरणांच्या अंमलबजावणीत होते. तिथे सुप्त पूर्वग्रहांमुळे उपेक्षा होते.

आता देशनिहाय परिस्थिती पाहू.

लेख-मर्यादेमुळे काही देशांचा आढावा त्रोटक आहे.

**दक्षिण आफ्रिका**

वर्णभेदाचा दीर्घ इतिहास असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेत चार वर्ण (रंग या अर्थी) आहेत - कृष्णवर्णीय (८०%), मिश्रवर्णीय (८-९%), भारतीय व इतर (२.५%), गोरे (९%). ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी पहिल्या तीन गटांना आरक्षण आहे. म्हणजे, नोकरीवर घेताना विशेष सवलती व नंतर बढती मिळते. अपंग व स्त्रिया यांनाही विशेष आरक्षण आहे. आरक्षण न पाळल्यास त्या उद्योगाला किंवा संस्थेला दंड होतो.

गुणवत्ता विरुद्ध आरक्षण या मुद्द्यावर कोर्टापुढे अनेक प्रकरणे येतात. मग औपचारिक समता आणि खरीखुरी समता या अंगाने न्यायालये या प्रश्नाकडे पाहतात. त्यासाठी युरोपमधील प्रमाणशीरतेची संकल्पना पुढे येते. म्हणजे विशिष्ट आरक्षणाने समतेच्या तत्त्वाचे प्रमाणाबाहेर उल्लंघन होऊ नये. त्या विशिष्ट प्रकरणाची खोलात तपासणी होते. (तक्रार करणारा, त्याची पात्रता, आर्थिक परिस्थिती, मानसिक संतुलन इ.) त्यामुळे आरक्षण समतेच्या प्रकल्पाला अपवाद राहत नाही. अमर्त्य सेन यांच्या मते समता हा समाजाचा पाया होण्यासाठी काही विषमता मान्य कराव्या लागतील. दक्षिण आफ्रिकेची न्यायालये त्या समाजातील कमालीची विषमता लक्षात घेऊन सेन यांच्या निरीक्षणानुसार जातात. त्यामुळे उपेक्षितांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे इतपत कामचलाऊ धोरण आहे. आरक्षणाची किंमत उपेक्षा न होणारे समूह देतात.

जर ही किंमत अवाच्या सव्वा झाली तर कोर्टाने हस्तक्षेप करावा. उपेक्षेचे अनेक प्रकार आहेत. शहरी-ग्रामीण, गोरे-कृष्णवर्णीय, सांस्कृतिक भेद वगैरे. या सगळ्या उपेक्षांवर एकसंध धोरण शक्य नाही. म्हणून वर्ण, स्त्री-पुरुष भेद आणि अपंगत्व यांच्यामुळे जे उपेक्षित होतात, त्यांच्यापुरते आरक्षण मर्यादित ठेवावे.

केवळ वर्ण हे आरक्षणाचे धोरण ठेवण्यातील धोके कालानुसार पुढे आले. अपात्र व्यक्ती, ज्या त्या पदाची जबाबदारी झेलू शकत

नाहीत, त्यांच्या नेमणुकीबाबत २००३ साली द. आफ्रिकेच्या सरकारने मान्य केले की सार्वजनिक क्षेत्रातील आरक्षणामुळे लायक लोक नोकरी सोडून गेले. आरक्षितांकडून सरकारी योजनांची कार्यवाही नीट झाली नाही व त्या तळागाळापर्यंत पोचू शकल्या नाहीत. यात शेवटी तोटा उपेक्षितांचाच झाला. उपेक्षितांचे प्रतिनिधित्व आणि संस्थेची कार्यक्षमता हा मुद्दा त्यामुळे पुढे आला. आरक्षण हे सुमार क्षमतेच्या लोकांना आसरा देण्याचे धोरण नाही. पण उपेक्षितांचे प्रतिनिधित्व व त्या प्रतिनिधींना नोकरीवर घेतल्यास संस्थेच्या कार्यक्षमतेवर होणारा परिणाम याचा अभ्यास प्रत्येक प्रसंगात व्हायला हवा. हे काम नको म्हणून संस्था 'लायक उमेदवार नाही' हे कारण देऊन आरक्षित जागाच भरत नाहीत. या जागांसाठी इतर समहूंचे (अनारक्षित) लायक उमेदवार उपलब्ध असूनही जागा मोकळ्या ठेवाव्या जातात.

उच्चपदांसाठी अशा अनेक जागा मोकळ्या आहेत. त्या मोकळ्या असल्याने संस्थेच्या कार्यक्षमतेवर होणारा परिणाम आणि उपेक्षित समूहातील अपात्र उमेदवार नेमण्याने होणारा परिणाम याची तुलना दरवेळी होत नाही.

युरोप-अमेरिकेत आरक्षण हे समतेच्या तत्त्वाचा अपवाद मानला जातो. त्यामुळे त्याची अंमलबजावणी फार काटेकोरपणे होते. दक्षिण आफ्रिकेत आरक्षण हा समतेच्या मार्गावरचा एक टप्पा मानला जातो. हा विकसित व विकसनशील देशातील फरक आहे.

**इस्रायल**

इस्रायलची जनता पुढीलप्रमाणे आहे : २०% अरब, १०% अतिउजवे कडवे ज्यू, ३५% युरोप-अमेरिकेहून स्थलांतरित झालेल्या ज्यूंच्या पुढच्या पिढ्या (हे दोन्ही ज्यू गोरे), उरलेले उत्तरआफ्रिका - आशियातून आलेले ज्यू. त्यामुळे धार्मिक-वंशीय-पंथीय व वर्णद्वेषी असे अनेक पूर्वग्रह पक्के रुजलेले आहेत. ज्यांना शक्य ते 'इतरां'ना उपेक्षेने वागवतात. त्यातही आफ्रिका-आशियातून आलेले ज्यू व अरब यांच्याबाबत तीव्र तुच्छता असते, ही प्रसंगी हिंसाचार करते. त्यामुळे हे दोन गट इस्रायलमधील आर्थिक व सामाजिक क्षेत्रात वरच्या पदांपर्यंत पोचत नाहीत. त्याबरोबर स्त्रियांचे २० वर्षांपूर्वीपर्यंत अगदी कमी असणारे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी इस्रायलमध्ये त्यांच्यासाठी आरक्षणाचे धोरण आले. धोरणाचे पालन झाले नाही तर त्या संस्थेतील संबंधित व्यक्तीला कायदा जबाबदार धरतो.

अभ्यासकांच्या मते हे धोरण इस्रायलमध्ये दोन विचारांवर आधारित आहे. पहिला विचार रोनाल्ड ड्वॉर्किन (Ronald Dwarkin) या तत्त्वज्ञाने मांडला. त्यानुसार न्यायव्यवस्था वर्तमान कायद्यांच्या पायाभूत तत्त्वांनुसार सतत व विना-अपवाद चालली पाहिजे. म्हणजे, न्यायव्यवस्थेचे निर्णय सारख्या प्रकरणांमध्ये सारखेच असले पाहिजेत आणि हे निर्णय अर्थातच पायाभूत तत्त्वांशी जुळणारे असले पाहिजेत. तसे न झाल्यास कायद्यामागची न्याय्य व्यवस्था सिद्ध होत नाही. (सारख्या प्रकरणातील 'सारखे' निर्णय याचे अलीकडचे उदाहरण म्हणजे जयललिता - सलमान खान - आसाराम बापू यांचे जामीन). दुसरा विचार जॉन एल्स्टर (Jon Elster) ने मांडला. त्याला तो 'दांभिकपणाच्या रेट्याने सभ्य वागावे लागते' असे म्हणतो. म्हणजे, जेव्हा लोक आजूबाजूला असतात तेव्हा आपण मनमानीने एखादे मत मांडत आहोत किंवा कृत्य करत आहोत असे दिसणे परवडणारे नसते. प्रसिद्धीच्या दडपणाखाली सभ्य वागावे लागते! उदा. बहुतेक राजकारणी कितीही पूर्वग्रहदूषित असले तरी टीव्ही कॅमेऱ्यासमोर त्यांना पूर्वग्रह उघड करता येत नाहीत. हा प्रसिद्धीचा श्रेयस्कर परिणाम असतो. (तोही झुगारून 'रामजादे-हरामजादे' ही वक्तव्ये आपल्याकडे होतात!)

इस्राएलमध्ये (ज्यू) स्त्रियांना आरक्षणाचा फायदा प्रथम मिळाला. १९८८ पासून विविध कायदे आले. सगळ्या सरकारी नोकऱ्या, समित्या इत्यादींवर स्त्रिया असल्या पाहिजेत असे नियम झाले. १९९३ साली संचालकपदांवर फक्त ७% स्त्रिया होत्या, २०१० साली ४४% झाल्या.

वरील दोन तत्त्वांनुसार अरब, इतर अल्पसंख्यांक, अपंग वगैरेंना असे आरक्षण तेव्हाच मिळायला पाहिजे होते. पण अरबांबाबत आकस असल्याने व तो जाहीर न करता येत असल्याने १२ वर्षे वेळकाढूपणा करून मग २००० साली त्यांना आरक्षित करण्यात आले. स्त्रियांप्रमाणेच सरकारी नोकऱ्यांत व समित्यांत मात्र. परिणामत: ही आरक्षणे खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, विधीमंडळे यांना लागू नाहीत तसेच जमीन विकत घ्यायलाही लागू नाहीत. जमीन हा इस्रायलमधील अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. (सगळा अरब-इस्रायल संघर्ष त्यावर आहे.) त्यादृष्टीने हे व्यवहार आरक्षणातून वगळणे सूचक आहे.

तरीही काही विद्यापीठांनी, राजकीय पक्षांनी स्वेच्छेने आरक्षण स्वीकारले आहे. त्यामुळे अरब व इथिओपियन ज्यू (हे कृष्णवर्णीय असतात) यांच्यावर हिंसाचारही होतात.

इस्रायली आरक्षणाचा एक विशेष म्हणजे जर आरक्षणाच्या धोरणाचे पालन झाले नाही तर त्या संस्थेतील संबंधित व्यक्तीला न्यायालय जबाबदार धरते. हेतुपुरस्सर दुर्लक्ष असे अशा प्रकारच्या कृतीला म्हटले जाते. एखाद्याला नोकरीवर घेताना, आरक्षण असणाऱ्या पात्र उमेदवारांची निवड न करणे हे या दुर्लक्षाचे उदाहरण.

एकूण इस्रायलमधील आरक्षणाचा आढावा घेता गोरे ज्यू हा प्रबल गट इतरांना नाराजीने सामावून घेण्याचा प्रयत्न (देखावा?)

करत आहे असे वाटते. आरक्षणही पश्चिमेच्या दबावाखाली होत असण्याची शक्यता आहे. राष्ट्रनिर्मितीपासूनचा अरबांवरील अन्याय दूर व्हावा ही खरी इच्छा दिसत नाही.

**ब्राझील**

भारताप्रमाणेच ब्राझील उगवती सत्ता आहे व तेथेही अतिगरीब व अतिश्रीमंत ही दरी वाढत आहे. २० कोटी लोकसंख्येच्या देशात ८.५% गरीबीरेषेखाली आहेत. ४८ लाख लोकांचे मासिक उत्पन्न शून्य तर सव्वा कोटींचे १ ते ३ हजार रुपये आहे. २०१० च्या जनगणनेनुसार ४८% गोरे, ४४% मिश्रवर्णीय (गोरे व कृष्णवर्णीयांच्या वर्णसंकरातून), ७% कृष्णवर्णीय व इतर १%. वर्णभेद हा आरक्षणाचा विषय आहे.

घटनेची ध्येये इतरत्र असतात तशीच उदात्त आहेत - न्याय्य, मुक्त समाज, वगैरे. त्याबरोबरच आरोग्य हा प्रत्येकाचा हक्क आहे आणि तो मिळवून देण्यासाठी सामाजिक व आर्थिक धोरणे आहेत.

शिक्षणाबाबतच्या हक्काची जबाबदारी राज्य व कुटुंब यांची आहे. शाळांमध्ये प्रवेशाची खात्री आहे. सार्वजनिक व खासगी क्षेत्रात नोकऱ्यांसाठी आरक्षण आहे. ते गौरेतरांसाठी २०% असणे अपेक्षित आहे. पण ते राज्यनिहाय बदलते. जास्तीत जास्त आरक्षण ४४% एका शहरात आहे तर काही राज्यांत गौरेतर ७०% किंवा जास्त असूनही त्यांना आरक्षण नाही. म्हणजे धोरणाची अंमलबजावणी सदोष आहे. अपंगांसाठी सार्वजनिक क्षेत्रात आरक्षण आहे. निवडणुकांच्या जागांत स्त्रियांसाठी बहुधा आरक्षणे कशी चालली आहेत याची नियमित तपासणी होत नाही. जेथे ती झाली, तेथे आरक्षणाने निश्चित चांगला फरक पडल्याचे दिसते. विशेषत: काही शिक्षणसंस्थांनी, खासगी क्षेत्राने, गृह-कर्जे देणारे यांनी आरक्षण सुरू केल्यावर गौरेतरांचे जीवनमान सुधारले.

**नायजेरिया**

नायजेरिया हा आफ्रिकेतील सर्वात संपन्न देश आहे. तेलाच्या निर्यातीतून संपत्ती निर्माण होते पण ती लोकांपर्यंत पोचत नाही कारण राजवटी कायमच अतोनात भ्रष्ट राहिलेल्या आहेत. नायजेरियात २५० ते ४५० भिन्न जमाती आहेत. प्रत्येक जमातीच्या भाषा, प्रथा, परंपरा, वेशभूषा, आर्थिक व शैक्षणिक स्तर व अनेकदा धर्मही निराळे आहेत. कोणती जमात कोणत्या प्रदेशात वर्चस्व गाजवते हा राष्ट्रीय तणाव सतत असतो. त्यामुळे येथे आरक्षणाचे धोरण उपेक्षित समूहांना समान संधी देण्यापेक्षा देश एकत्र राखण्यासाठी आखण्यात आले.

राखीव जागा टक्केवारीने ठेवणे ही आरक्षणाची पद्धत आहे. सगळ्या सरकारी खात्यात, लष्करात, पोलिसांत आरक्षण आवश्यक आहे व ते न केल्यास तो गुन्हा होतो.

शैक्षणिक क्षेत्रात ४५% जागा गुणवत्तेनुसार देण्यात येतात; ३५% जागा विद्यार्थी कॉलेजच्या, विद्यापीठाच्या आसपास राहत असला तर राखीव असतात; तर २०% जागा देशातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतात.

सरकारी नोकऱ्यांसाठी आरक्षण विभागानुसार आहे. देशाचे विभाग निश्चित आहेत व सर्वांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून कमाल व किमान मर्यादा आहेत. एखाद्या विभागात अनुशेष असला तर तो दुसऱ्या विभागातून भरला जातो.

आरक्षणात स्त्रियांचा विचार नाही. ज्या काही एक-दोन तरतुदी आहेत त्यातही पुरुषी पूर्वग्रह दिसतो. उदा. महिलेचे वैवाहिक निवासाचे स्थान, ती विवाहित असणे हे ती महिला असण्यापेक्षा निर्णायक असते. तसे कागदावर महिलांच्या आरोग्याविषयी निर्देश बरेच आहेत पण बालविवाह, बालमृत्यू, प्रसूतीत मृत्यू याचे प्रमाण नायजेरियात जगातील सर्वात जास्त पैकी आहे.

एकूण येथे आरक्षणात निश्चित दिशा, ठोस उद्दिष्टे दिसत नाहीत व भ्रष्टाचाराने अंमलबजावणीही नीट होत नाही.

**मलेशिया**

मलेशिया द. आफ्रिकेसारखेच बहुसंख्यांकांसाठी आरक्षण करतो. मलेशियातील मूळच्या रहिवाशांना भूमिपुत्र म्हणतात. ते मलाय व मलाय नसलेले असे दोन्ही असतात. ते सुमारे ६७% आहेत तर इतरांपैकी चिनी वंशाचे सुमारे २५% व ७% भारतीय वंशाचे लोक आहेत.

१९५७ च्या स्वातंत्र्याच्या वेळी देशाच्या शेती व खासगी क्षेत्रात भूमिपुत्रांकडे जेमतेम दीड टक्का भांडवल होते. जास्त करून परदेशी व चिनी लोकांकडे भांडवल होते. भूमिपुत्र जास्त करून सरकारी नोकऱ्यांत होते. शिक्षणात ते मागासलेले होते व १९७० पर्यंत ७०% हून जास्त दारिद्र्यरेषेखाली होते.

मलेशियात आरक्षण विविध क्षेत्रात या पार्श्वभूमीवर आले. ते घटनेत सुरुवातीपासून नमूद होतेच पण १९७० नंतर अधिक जोमाने होऊ लागले. त्याचे क्षेत्रनिहाय स्वरूप पाहू.

उद्योग क्षेत्रात मोठ्या उद्योगासाठी परवाना मिळवायचा असेल, तर किमान ३०% भागभांडवल भूमिपुत्रांचे हवे अशी अट आली. हे भागभांडवल त्यांना कमी दराने मिळाले; इतर सबसिडी, बीजभांडवल, पैशाबाबत सरकारी हमी याही सवलती फक्त भूमिपुत्रांच्या उद्योगांना देण्यात आल्या. आधीच्या सरकारी उद्योगांचे खासगीकरण करताना निविदा, लिलाव अशा खुल्या पद्धती वापरल्या गेल्या नाहीत. वशिला, राजकीय जवळिकी व अनुषंगिक भ्रष्टाचार हे निर्णायक घटक ठरले. (काँग्रेस राजवटीतील स्पेक्ट्रम, कोळशाच्या खाणी). या धोरणांमुळे भूमिपुत्रांकडे उद्योगांची मालकी तर आली पण तो चालवण्याचा अनुभव किंवा कौशल्य नसल्याने अनेक उद्योग आजारी झाले. भूमिपुत्रांचा

भांडवलदार वर्ग झपाट्याने वाढला हे आरक्षणाचे यश मानले गेले पण नंतर १९९७-९८ च्या जागतिक आर्थिक आणीबाणीत बहुतेक उद्योग वाहून गेले. तरी भूमिपुत्रांना परवाने, कंत्राटे देणे चालू आहे. आरक्षणाचा उद्देश भूमिपुत्रांनी उद्योगधंदे सुरू करावेत, त्यांची दीर्घकालीन मालकी त्यांच्या हातात जावी, या क्षेत्रातील प्रमाण वाढावे असा होता. तसे झाले नाही. झटपट श्रीमंत होण्याच्या मोहाने जमिनी विकत घेण्यासारख्या अनुत्पादक व्यवहारात भांडवल गुंतवले गेले. त्यात राजकीय ढवळाढवळ, भ्रष्टाचार, अयोग्य लोकांचा भरणा यामुळे हे क्षेत्रच भ्रष्ट झाले. वाढ झाली ती फक्त कमी तंत्रज्ञानाच्या उद्योगात. तेथेही राजकीय वरदहस्त महत्त्वाचा ठरल्याने खरे निर्णय घेणारी मंडळी आधीचीच राहिली आणि कमी हातात जास्त पैसा गेला. उच्चशिक्षणातील आरक्षणामुळे, 'फक्त भूमिपुत्रांसाठी' निर्माण करण्यात आलेल्या शिक्षणसंस्थांमुळे पदव्युत्तर भूमिपुत्रांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. त्याचवेळी आपल्याकडच्यासारख्या पैसे घेऊन प्रवेश देणाऱ्या संस्था वाढल्या. तेथे गुणवत्ता काटेकोरपणे पाळली गेली नाही व शिक्षणाचा दर्जा एकदम घसरला. मग या पदवीधरांना नोकरीवर घ्यायला खासगी क्षेत्र नाखूष झाले. वस्तुत: शैक्षणिक आरक्षणाचा एक हेतू या नव्या पदवीधरांनी खासगी क्षेत्रात शिरावे हा होता. तो साधला नाही.

अशा आरक्षणाच्या धोरणाचा मलाय मानसिकतेवर अनिष्ट परिणाम झाला. त्यांची प्रबंधक क्षमता, आत्मविश्वास, स्वयंनिर्भरता कमीच होऊ लागली. आज ४० वर्षांनी आरक्षण थांबले तर मलाय समाज पूर्वपदाला जाईल अशी शक्यता आहे. कारण त्यांनी नवीन तंत्रज्ञान, बदलती कौशल्ये आत्मसात केली नाहीत. घटनेतच आरक्षणाची तरतूद असल्याने आरक्षणाला क्षितिज नाही. ते कितीही काळ चालू शकते. शिवाय भूमिपुत्र नसणाऱ्यांना 'माझ्यावर अन्याय झाला (नोकरी, शिक्षणसंस्थेत प्रवेश, स्वस्त कर्ज मिळणे, वगैरे)' अशी तक्रार करण्यासाठी वैधानिक संस्थाही नाही. इतरत्र न्यायालये, ट्रिब्यूनल्स् असतात. त्यामुळे आता वंशानुसार आरक्षणाऐवजी गरजेनुसार ते द्यावे असा विचार पुढे येत आहे.

**भारत**

आरक्षण सतत चर्चेत असते (राजस्थान - गुज्जर, गुजरात - पटेल). म्हणून सविस्तर आढावा घेतलेला नाही. दोन-तीन महत्त्वाचे मुद्दे असे -

- मंडल आयोगापासून आरक्षण नोकरशाहीच्या अखत्यारीतून निर्वाचित सरकार व न्यायालयाच्या अखत्यारीत गेलेले दिसते. आरक्षण ही राजकीय गरज याअर्थी.

- इतर मागास जातीतील creamy layer - तुपट तवंग - निश्चित केल्याखेरीज खऱ्या उपेक्षितांना फायदा होणार नाही. मुस्लिमांना आर्थिक, सामाजिक निकषांवर आरक्षण आवश्यक आहे. (साचार समिती).

सध्याच्या राजकीय वातावरणातील त्या समाजाचे अधिक दुरावणे हितावह नाही.

या देशनिहाय आढाव्यानंतर परत जागतिक चित्राकडे वळू.

**आरक्षणाच्या मर्यादा**

खासगी मालमत्तेवरील हक्क बाजारात विषमता निर्माण करतो. गरीबी व बेरोजगारी ही या विषमतेची उदाहरणे आहेत. आरक्षण या दुष्परिणामांचे निर्मूलन नाही तरी त्यांचा उपेक्षितांवरील आघात कमी करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे त्याला प्रमुख मर्यादा म्हणजे लोकशाही भांडवलशाहीतील खासगी मालमत्तेचा हक्क ही आहे.

आज जगाच्या सुमारे साडेचार अब्ज प्रौढ लोकसंख्येत एक सहस्रांश लोकांकडे जगाची २० टक्के मालमत्ता आहे तर एक शतांश लोकांकडे ५०% - तळातल्या ५०% लोकांकडे म्हणजे निम्म्या लोकसंख्येकडे ५ टक्के मालमत्ता आहे. दुसऱ्या शब्दांत जगाच्या मालमत्तेतील अगदी थोडी मालमत्ता सामाजिक भांडवल म्हणून पुनर्वितरणाला उपलब्ध आहे. विकसित देशात दुबळ्या स्तरांसाठी असणाऱ्या सामाजिक कार्यांवरील खर्च एकदम आक्रसत आहे. विकसनशील जगाला तर आधीच कमी असलेलाही परवडेनासा झालेला दिसतो.

आंतरराष्ट्रीय अर्थव्यापारावर कोणत्याच राष्ट्रराज्याचे नियंत्रण नाही. परकीय चलनाचा (वस्तू किंवा सेवा नव्हे) व्यापार जगात रोज ५ ट्रिलियन डॉलर्स होतो (एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शून्ये). त्यातील अफरातफरीबाबत मे महिन्यात पाच बड्या बँकांना साडेपाच बिलियन डॉलर्स दंड झाला. (बिलियन म्हणजे एकावर नऊ शून्ये.) हे प्रकरण उघडकीला आले म्हणून बँकांनी गुन्हा तरी मान्य केला. या परिस्थितीत इच्छा असली तरी राष्ट्र-राज्य आरक्षणाद्वारे किती उपेक्षितांना किती पुढे नेणार? १९८७ साली जगात १४० अब्जाधीश होते. आज १४०० आहेत. वाढीव विषमता यावरून दिसते.

आरक्षणाची दुसरी मर्यादा कायद्यावर अवलंबून असणे ही आहे. कायदा हे श्रेयस्कर परिवर्तनाचे साधन मानले जाते. वस्तुत: समाजातील बहुतेक सर्वच प्रवाह कायद्याच्या अरुंद चौकटीबाहेर चालू असतात. पुस्तकी कायदा विशिष्ट मुद्द्यांवर दोन पक्षांकडून (उदा. आरक्षणवादी व आरक्षणविरोधी) नेमके खुलासे, नेमके पुरावे व नेमकी जबाबदारी मागतो. त्यामुळे कायद्यापुढे आलेला संघर्ष अगदीच संकुचित दृष्टीने पाहिला जातो. आरक्षणामागे अनेक प्रवाह, अनेक हितसंबंध असतात. आरक्षणाने सामाजिक न्याय मिळेल म्हणणे निराळे व कायद्याने तो प्रत्यक्षात आणणे निराळे. आर्थिक स्तर, शैक्षणिक, व्यावसायिक संधींचा अभाव, राहण्याचे ठिकाण, कठीण बालपण, आजारपण, आरोग्यसेवेचा अभाव इत्यादी शक्यता

व्यक्तीच्या आयुष्यात असतात. त्यात 'दिसणारे' घटक म्हणजे स्त्री का पुरुष, जात, वर्ण, अपंगत्व, वय इत्यादी. यातील एकाच कारणावर लक्ष केंद्रित करणे (शैक्षणिक संधी देणे) म्हणजे इतर कारणांकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना खतपाणी घालणे. उपेक्षेचे चक्र एकरेषीय सकारात्मक उपायाने बंद पडत नाही. ते उपायही संघर्षातून जन्माला आले असतील तर खरीखुरी सामाजिक समानता येणे अवघड आहे.

युजीन एर्लीश (Eugen Ehrlich) या विचारवंताच्या शब्दांत, वस्तुस्थितीची दिशा कायदा ठरवू शकत नाही. माणसे कोणत्या निराळ्या प्रवाहांमध्ये कशी जगतात याची व्यापक जाण असणारा कायदा अस्तित्वात नाही आणि असणार नाही. दुसऱ्या शब्दांत, सद्यव्यवस्थेत उपेक्षितांना बसवण्याचा आरक्षण प्रयत्न करते. खासगी मालमत्तेचा हक्क, जागतिकीकरणाने वाढलेला पैशाचा व्याप वगैरे घटकांनी समर्थ होत चाललेल्या व्यवस्थेला हात लावत नाही व आरक्षणाची निरंतर जरूरी या व्यवस्थेने निर्माण होते.

**रक्षण**

आरक्षणाच्या आढाव्यानंतर आता रक्षणाचा मुद्दा पाहू. ज्यांच्यासाठी रक्षण हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे अशा काही समूहांचा प्रातिनिधिक आढावा मात्र लेखनमर्यादेत शक्य आहे. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे हा अनारक्षित-आरक्षित यांच्या खालचा तिसरा स्तर. (त्याला अ-रक्षित म्हणू.) हे समूह आपल्यासमोर अस्तित्वात येत आहेत. त्यांच्याबद्दल पूर्वग्रह असतील किंवा माहितीच त्रोटक असेल पण फारसे चिंतन होताना दिसत नाही. फक्त प्रसंग ते प्रसंग अशी वार्तापत्रे येतात. बळींची संख्याही निश्चित कोणाला माहिती नसते. जगातील एकूण विस्थापितांची संख्या ६ कोटी असावी. हा फक्त एक समूह. पण यावरून मानवी वेदनेची व्याप्ती लक्षात यावी.

काही समूह असे - निर्वासित लोक; आफ्रिकेतील बलात्कारांच्या बळी स्त्रिया; तेथे सक्तीने वांशिक युद्धात भरती होऊन मानवी हत्या करणारी १०-१२ वर्षांची मुले; दक्षिण अमेरिका खंडातील अंमली पदार्थांच्या व्यापारातील भरती, हिंसा व हत्या टाळण्यासाठी अमेरिका देशाला येऊ पाहणारी मुले; श्रीलंकेतील चहाच्या मळ्यातील तमिळ कामगार इत्यादी अनेक.

पुढील उदाहरणांवरून रक्षणाची निकड लक्षात यावी. आरक्षण जिवंत माणसांसाठी असते. रक्षण त्याआधी आले पाहिजे. पण आपले प्राधान्यक्रम कालानुरूप लवचिक नाहीत, म्हणून आता तरी रक्षणाकडे लक्ष द्यावे.

**जगभरचे निर्वासित**

२०११ च्या अरब वसंतापासून मध्यपूर्वेत, आधीपासून अफगाणिस्तानात व अलीकडे पूर्व आफ्रिकेत हिंसाचार वाढले आहेत. त्यातून फार मोठ्या प्रमाणावर निर्वासित तुर्कस्तान, युरोपकडे येऊ लागले आहेत. जगण्याची शाश्वती न राहिल्याने अक्षरश: अंगावरच्या कपड्यांनिशी लोक लाखाने देशोधडीला लागले आहेत. राजवट अस्तित्वात नसणे (लिबिया, येमेन, सोमालिया); असल्यास आपल्याच लोकांची कत्तल (सिरिया, इराक); विकृत हिंसक 'धार्मिक' शक्ती (परत सिरिया, इराक व एरिट्रीया, इथिओपिया); वांशिक दुष्मनी (माली, येमेन, सुदान, म्यानमार - येथे बहुसंख्य बौद्ध विरुद्ध अल्पसंख्य रोहिंग्या मुस्लिम); गरीबी (अफगाणिस्तान, बांगलादेश) अशी अनेक कारणे देशानुसार त्यामागे अहेत.

हे लोक आधी जमिनीवरून, मग समुद्रमार्गे अत्यंत असुरक्षित प्रवास करतात. कित्येक हजारात लोक या प्रवासात मृत्युमुखी पडलेले आहेत. जे युरोपपर्यंत पोचले, त्यांना थोडेफार संरक्षण मिळते. मागे राहिलेल्यांची परिस्थिती तर भयानक असते. आजूबाजूला युद्ध व अराजक. (एकट्या सिरियातच संघर्षामुळे निम्मी लोकसंख्या अंतर्गत किंवा देशाबाहेर विस्थापित आहे - सुमारे एक कोटी.) इस्लामिक स्टेट (सिरिया-इराक), बोको हराम (नायजेरिया), अल-शबाब (पूर्व आफ्रिका), तलेबान (अफगाणिस्तान, पाकिस्तान) अशा कडव्या मुस्लिम अत्याचारी संघटनांचा मोठ्या भू-भागावर अंमल आहे व वाढत आहे.

स्त्री-पुरुषांना आचार-विचार-पोशाख वगैरे स्वातंत्र्ये दूरच; या संघटनांच्या इस्लामच्या समजुतीबाहेरच्या लोकांची (स्व- व पर-धर्मीय) हत्या 'धर्ममान्य' आहे. सार्वजनिक शिरच्छेद पाहण्यासाठी ९-१० वर्षांची मुले गर्दीत कुतूहलाने पुढे-पुढे जाताना दिसतात. त्यांचे शिक्षण पोथीबद्ध इस्लाम. याझिदी नावाच्या अ-मुस्लीम अल्पसंख्यांक जमातीतील १०-१२ वर्षांच्या मुलींवर सामूहिक बलात्कार होतात व ते कृत्य देवाला प्रसन्न करते. यातून अनेकींना दुर्धर विकार झालेले आहेत.

एकूण इराक-सीरियात आज दीड कोटी मुले शाळेबाहेर आहेत. कारण शाळाच नाहीत. ती गेली दोन-तीन वर्षे उघड्यावर व कमालीच्या हिंसाचाराच्या वातावरणात वाढत आहेत. नजीकच्या भविष्यात हिंसाचार कमी होईल अशी चिन्हे नाहीत. ही संपूर्ण पिढी हा मध्यपूर्वेसाठीच नाही तर उर्वरित जगासाठी चिंतेचा विषय आहे.

**आफ्रिकेतील बलात्कारित स्त्रिया**

१९९४ च्या हुतु-तुत्सी वंश-युद्धात अडीच ते साडे-तीन लाख तुत्सी स्त्रियांवर बलात्कार झाले. पुनरुत्पादन अशक्य करण्यासाठी जननेंद्रियांवर तीक्ष्ण शस्त्रांनी जखमा करण्यात आल्या. एडस्‌चे पेशंट इस्पितळातून सोडवण्यात आले, तेही बलात्कार करत. जेणेकरून स्त्रियांना ती लागण व्हावी व झालीही. २००३ मध्ये सुदानमध्ये अरबांनी दक्षिणेतील कृष्णवर्णीय स्त्रियांवर असेच

अत्याचार केले. त्यातही काही हजार स्त्रिया कायमच्या विकलांग झाल्या. दोन्ही ठिकाणी जन्मलेली मुले बहुधा अनाथ. या प्रमाणात नाही पण उत्तर नायजेरियात हाच प्रकार बोको हरामच्या (शब्दश: अर्थ - पाश्चात्त्य शिक्षण अमान्य) अंमलाखालील प्रदेशात चालू आहे. मागच्या वर्षी त्यांनी २५० मुली शाळेच्या वसतीगृहातून पळवल्या. त्यातील ख्रिश्चन मुलींचे धर्मांतर करून गुलाम म्हणून लिलाव केले. आता सरकारने हा प्रदेश सोडवण्यास सुरूवात केली आहे. तेथे पीडित महिलांसाठी उघडलेल्या केंद्रात १५००० स्त्रिया दाखल झाल्या आहेत. (रुग्ण, गर्भार, माता...). इथपर्यंत न पोचू शकलेल्या (सामाजिक शरमेने, विकाराने इ.) स्त्रियांची संख्या अज्ञेय आहे. हे 'धर्मयोद्धे' बलात्काराआधी व नंतर देवाची प्रार्थना करत की हा जहाल इस्लामचा वारसा संभाव्य संततीने पुढे चालवावा.

९-१० वर्षांच्या मुलींना आत्मघातकी हल्ल्यांचे शिक्षणही देण्यात येते. निवड झालेल्या मुलीला स्फोटकांचे पट्टे बांधून, परत प्रार्थना करून, शहरात बाजाराच्या ठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी पाठवण्यात येते. स्फोटात अर्थातच ती मुलगी मरण पावते. पण बरोबर आजूबाजूचे लोक घेऊन.

**आरक्षण व रक्षण : भविष्याचा वेध**

आरक्षणाचे सिंहावलोकन करता देशनिहाय त्याचा उगम कसा झाला ते पहाण्यासारखे आहे. ब्राझीलमध्ये लष्करशाहीविरुद्धचा लढा लोकशाहीत समाविष्ट होण्याच्या उपेक्षितांच्या लढ्यात परिवर्तित झाला व त्यातून आरक्षण आले. दक्षिण आफ्रिकेत अधिकृतरीत्या वर्णभेद संपल्यावर लढा आरक्षणाच्या दिशेने गेला. भारतात स्वातंत्र्याचा लढा अनुसूचित जाती-जमातींच्या हक्कांच्या जाणीवेत प्रकट झाला. मलेशियात भूमिपुत्रांची दडपणूक अशी झाली नाही त्यामुळे तेथील आरक्षण आत्मभानाचा आविष्कार मानता यावे तर नायजेरियात देश एकत्र ठेवण्यासाठी आरक्षण झाले. त्याची तुलना संस्थानांच्या विलीनीकरणाशी करता यावी.

म्हणजे, आरक्षण हा लोकशाहीच्या उत्क्रांतीतील टप्पा मानता येईल. त्या अनुषंगाने लेखात वर म्हटल्याप्रमाणे धर्म बाजूला ठेवून आर्थिक-सामाजिक कसोट्यांवर भारतात मुस्लिमांना आरक्षणाची जरूरी आहे. त्याने आपली लोकशाही अधिक बळकट होईल.

एकूणच जागतिक पटलावर लोकशाही देशांनी तरी आरक्षणाच्या पुढे जाण्याची वेळ आलेली दिसते. (इतर प्रकारच्या राजवटींकडून ती अपेक्षा ठेवता येत नाही). काही उपेक्षित अदृश्य समूह आरक्षणाने दृश्य केले. पण रक्षणाची गरज असणारे समूह आजही अदृश्य आहेत. ते नव्याने निर्माणही होत आहेत. या उद्याच्या हाका न ऐकणे करंटेपणा होईल.

शोषक-शोषित या साध्या काळ्या-पांढऱ्या समीकरणात रक्षण आवश्यक असणारे समूह बसत नाहीत. त्याचे एक कारण म्हणजे अशी समीकरणे कोणतीतरी 'मागची' व्यवस्था गृहीत धरतात. मग ती व्यवस्था द्वंद्वात्मक स्त्री-पुरुष भेद असेल, चातुर्वर्ण्य असेल किंवा वंशभेद असेल. हे समूह त्यांच्या ठिकाणच्या व्यवस्थाच मोडकळीस आल्याने अस्तित्वात आले आहेत. त्यामुळे त्यांच्या सद्यस्थितीला कोणा एका संस्थेला दोषही देता येत नाही, कारण संस्थाच राहिलेल्या नाहीत.

उदाहरणार्थ, सिरिया-म्यानमारमध्ये राष्ट्र-राज्यच त्यांच्याविरुद्ध आहे. ते जागतिक दडपणाला जुमानत नाहीत. उत्तर आफ्रिका, दक्षिण अमेरिका येथे राष्ट्र-राज्यच अक्षम आहे.

पश्चिम युरोपचे सध्याचे धोरण उत्तर आफ्रिकेतील व मध्यपूर्वेतील स्थलांतरण इच्छुकांना मानवी प्रतिष्ठेने रक्षण देण्याचा प्रयत्न करते. ते अभ्यासण्यासारखे आहे. आरक्षणाच्या काही अभ्यासात असे आढळून आले आहे, की ते अगदी तळातल्या विशेषत: तरुणपिढीपर्यंत पोचतच नाही. मानसिक नैराश्य, अतिदारिद्र्याने उद्याचा विचार करण्याची क्षमता नसणे त्यामुळे उभारी खच्ची होणे अशी गंभीर कारणे त्यामागे असतात. असे लोक नोकरीची संधी आली तरी अर्जही करू शकत नाहीत. हा समूह आरक्षण-रक्षणाच्या सीमेवर पहावा लागेल.

सामाजिक भांडवलाची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता अरक्षित, आरक्षित व त्यांच्या सीमेवरील समूहांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

**काही प्रमुख संदर्भ**


Amartya Sen : Inequality Re-examined

John Rawls : A Theory of Justice

Thomas Piketty : Capital in the Twenty First Century

Ockert Dupper and Kamala Sankaran (Eds.) : Affirmative Action : A View from the Global South

New York Times, The Guardian, The Economist या वृत्तपत्रांचे गेल्या काही वर्षांचे अंक

इतर संदर्भ इंटरनेटवरून व टीव्हीच्या आंतरराष्ट्रीय वार्तापत्रांवरून



*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*


❒